स्वामी स्वरूपानंद सह. पतसंस्था, रत्नागिरी यांचे मुखपत्र

# स्वरूप सहकार

सप्टेंबर २०२५

ठेवींच्या सोनपावलांनी
यावी संपन्नता घरोघरी
देऊनि अर्थचक्राला गती
साजरा करु दसरा अन् दिवाळी!



## स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था

# खुणावतेय सीमोल्लंघन ठेवींची नवी उंची गाठण्यासाठी!

दसरा-दिवाळी स्वागत ठेव योजनेत सहभागी होताय ना?


वाहन खरेदी कर्ज
प्रति लाख हप्ता
२११३/-*
(मुदत ५ वर्ष)
स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था
मर्यादित रत्नागिरी जिल्हा | कार्यक्षेत्र महाराष्ट्र राज्य
प्रेसिडेन्सी बिझनेस हाऊस, २ रा मजला, एस.टी.स्टॅण्डसमोर, रत्नागिरी.
9403 506 363
www.swaroopanandpatsanstha.com


२० मिनिटांत उपलब्ध!
जलद, सुलभ, किफायतशीर
सोनेतारण
कर्ज
मर्यादा १ कोटी पर्यंत
अल्प व्याजदर *
ऐवजाचे जास्तीतजास्त व्हॅल्युएशन
तुमच्या ऐवजाची संपूर्ण सुरक्षितता
स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था
मर्यादित रत्नागिरी जिल्हा | कार्यक्षेत्र महाराष्ट्र राज्य
प्रेसिडेन्सी बिझनेस हाऊस, २ रा मजला, एस.टी.स्टॅण्डसमोर, रत्नागिरी.
9403 506 363
www.swaroopanandpatsanstha.com

## संपादकीय


# विश्वासार्हता हा आर्थिक संस्थांच्या कार्यपद्धतीचा आत्मा

आर्थिक संस्था, त्यातही प्रामुख्याने पतसंस्था सभासदांच्या भांडवलावर अर्थजगतात प्रवेश करतात. विवक्षित भांडवल जमल्याशिवाय पतसंस्थेला नोंदणी प्राप्त होत नाही. प्रत्येक सभासद संस्थेच्या स्थापनेसाठी भाग खरेदी करतो आणि अन्य पूर्तता केल्यानंतर संस्थेची नोंदणी होते. नोंदणी झाल्यानंतर संस्थेला कायद्याच्या परिभाषेत स्वतंत्र अस्तित्व प्राप्त होते. कायदेशीर व्यक्तीचा दर्जा सहकारी कायदा कलम ३६नुसार नोंदणीकृत संस्थेला प्राप्त होतो. स्वतंत्र व्यक्ती म्हटले, की व्यक्तीचा स्वभाव, व्यक्तीच्या चालीरीती, कार्यपद्धती यांवरून व्यक्तीची प्रतिमा निर्माण होते. तद्वत आर्थिक संस्थेचेही आहे. संस्थेची प्रतिमा निर्माण करण्यासाठी संस्थेची उद्दिष्टे, संस्थेची कार्यपद्धती, संस्थेसाठी काम करणारी माणसे, त्यांचे चारित्र्य, बुद्धिमत्ता, विचारपद्धती या सगळ्याचा मोठा परिणाम होत असतो.

पतसंस्थांमध्ये मोठ्या प्रमाणावर ठेव गुंतवणूक होत असते. या ठेवी ठेवीदार सभासद संस्थेवर, संस्थाचालकांवर विश्वास ठेवून गुंतवत असतात. ठेवीदारांचा हा पैसा कष्टाचा असतो. भविष्याचे नियोजन म्हणून या ठेवी गुंतवल्या जातात. ठेवींवर मिळणारा आकर्षक व्याजपरतावा व ठेवींची सुरक्षितता, त्याचबरोबर संस्थेबद्दल वाटणारी आत्मीयता, जनमानसात असलेली संस्थेची प्रतिमा या सर्वांचा प्रभाव गुंतवणूकदारावर पडत असतो.

पतसंस्थेची प्रतिमा अर्थकारणासाठी परिणामकारक ठरत असेल, तर संस्थेची प्रतिमा स्वच्छ, शिस्तबद्ध, विश्वासार्ह बनवणे अनिवार्य ठरते. केवळ टोलेजंग अद्ययावत कार्यालयाचा देखावा संस्थेची प्रतिमा बनवत नाही, तर संस्थेची ग्राहकसेवा, संस्थेच्या आर्थिक योजना, संस्थेच्या हिशेबीय पद्धतीतील अचूकता, आर्थिक शिस्त, संस्थेचे एकंदर आर्थिक व्यवहार, या व्यवहारांतून प्राप्त होणारा नफा या सगळ्या गोष्टी संस्थेची प्रतिमा जनमानसात निर्माण करत असतात. प्रतिमा एका रात्रीत तयार होत नाही, तर संस्थेची कार्यपद्धती, संस्थेचे उपक्रम यातून प्रतिमा हळूहळू बनत जाते. उत्तम प्रतिमा निर्माण करण्यासाठी पतसंस्थांच्या पदाधिकाऱ्यांची, संस्थाचालकांची व्यक्तिगत, सामाजिक प्रतिमाही प्रभाव टाकत असते. विश्वासार्ह पदाधिकारी, संचालक हे जनमानसात सकारात्मक संदेश देतात आणि त्याचा सकारात्मक परिणाम पतसंस्थेच्या प्रतिमेवर होत असतो.

पतसंस्था ठेवी संकलित करतात. पतसंस्थांना बँकांपेक्षा एक ते दीड टक्का जास्त ठेव व्याजदर देण्याची मुभा असते. पतसंस्थांचा प्रशासकीय खर्च बँकांपेक्षा तुलनेने कमी असतो. त्यामुळे बँकांपेक्षा थोडा अधिकचा व्याजदर पतसंस्थांना सहज परवडू शकतो; मात्र अनेक वेळा ठेव व्याजदरासंदर्भाने आलेली लवचीकता बेफिकीरपणे वापरून चढे ठेव व्याजदर दिले जाऊन ग्राहकाला आकृष्ट केले जाते. ग्राहक अतिरिक्त व्याजपरताव्याच्या मोहजालाला भुलतो आणि गुंतवणूक करतो. ठेवीदारांनी गुंतवलेला पैसा कर्जवितरणासाठी वेळीच वापरला गेला, तरच ठेवींवर व्याज देण्यासाठीचे उत्पन्न पतसंस्थांना प्राप्त होते. अन्यथा संकलित ठेव न वापरता पडून राहण्याचा धोका असतो. त्यामुळे 'फंड कॉस्ट' वाढते आणि संस्थेच्या नफ्यावर ताण येतो. त्यामुळे संकलित होणाऱ्या योग्य व्याजाच्या ठेवी आणि स्पर्धात्मक अर्थकारणात किफायती दराने होणारे प्रमाणबद्ध कर्जवितरण हे समीकरण नीट साधणे दूरगामी विश्वासार्हता निर्माण करण्यात मोठे योगदान करते. संस्था करत असलेली कर्जवसुली, एनपीएचे प्रमाण, निव्वळ नफा, भांडवल पर्याप्ततेचे प्रमाण, गुंतवणुकांचे प्रमाण, केलेल्या नियमित तरतुदी, नियमित लेखापरीक्षण, लेखापरीक्षण वर्ग, ठेव रकमेत होणारी सातत्यपूर्ण वाढ, स्वनिधी या गोष्टी सातत्याने प्रमाणबद्ध राहिल्या, की संस्थेच्या प्रतिमेला अधिक चमक प्राप्त होते. कर्तव्यनिष्ठता, कायद्यांचे पालन, ग्राहकसेवा, संचालक मंडळाचा प्रभाव, कर्मचाऱ्यांच्या कामाचा दर्जा, माध्यमांमध्ये येणारी सकारात्मक वृत्ते, उपक्रमशीलता या सगळ्या गोष्टी आर्थिक संस्थेची विश्वासार्हता वृद्धिंगत करतात. ग्राहक सभासद संख्या आणि समाजमानस यांची संलग्नता संस्थेला अग्रस्थानी नेत असते, हा अनुभव स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेने घेतला. कमालीचे सातत्य आणि प्रमाणबद्धता राखत गेली ३४ वर्षे पतसंस्थेने ठेवींमध्ये वाढ, कर्जांची विक्रमी वसुली, वाढीव स्वनिधी, सातत्यपूर्ण वाढता नफा, वाढत जाणाऱ्या गुंतवणुका, विविध पुरस्कार, तालुका ते राज्य कार्यक्षेत्र असा प्रवास, १७ शाखा, नऊ स्वमालकीची कार्यालये, ४८ हजारांच्या घरात सभासद अशा चढत्या भाजणीत सातत्यपूर्ण उत्तम प्रतीचे विश्वासार्ह अर्थकारण केले. या विश्वासार्हतेच्या कवचकुंडलांच्या संरक्षणात स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेचे आर्थिक विश्व बहरताना आपण पाहतोय. संस्थेच्या गुणात्मक सेवांचा अनुभव आपण घेतोय. म्हणूनच विश्वासार्हता हा आर्थिक संस्थेचा आत्मा ठरतो.



**- ॲड. दीपक म. पटवर्धन**
**अध्यक्ष, स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था**
**संपादक, स्वरूप सहकार**

स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था म., रत्नागिरी जिल्हा या पतसंस्थेचे 'स्वरूप सहकार' हे मासिक स्वरूपानंद प्रिंटिंग सर्व्हिसेस, लांजा येथे छापून प्रेसिडेन्सी बिझनेस हाउस, एस. टी. स्टँडसमोर, रत्नागिरी-४१५६१२ येथे प्रसिद्ध केले.
**सप्टेंबर २०२५. पाने १६. संपादक :** ॲड. दीपक मनोहर पटवर्धन. **कार्यकारी संपादक :** अनिकेत कोनकर.
**मुद्रक, प्रकाशक :** ॲड. दीपक मनोहर पटवर्धन. **मांडणी आणि सजावट :** कोकण मीडिया, एटीएमएस ग्राफिक्स.
**संपादकीय पत्रव्यवहाराचा पत्ता :** प्रेसिडेन्सी बिझनेस हाउस, एस. टी. स्टँडसमोर, रत्नागिरी-४१५६१२. संपर्क : (०२३५२) २२१२६३/२९५३६३.
**वेबसाइट :** https://swaroopanandpatsanstha.com/ **ई-मेल :** swaroopsahakarrtn@gmail.com.

**This Monthly Swaroop Sahakar printed and published by Adv. Deepak Manohar Patwardhan, on behalf of Swami Swaroopanand Sahakari Patsanstha Ltd., Ratnagiri and printed at Swaroopanand Printing Services, Lanja and published at Presidency Business House, Opp. S. T. Stand, Ratnagiri-415612. Editor: Adv. Deepak Manohar Patwardhan. Executive Editor: Aniket Konkar. September 2025.**

# ४०० कोटींचा टप्पा : सीमोल्लंघनाच्या दिशेने...

पाहता पाहता स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेच्या ठेवी ३७९ कोटी रुपयांपर्यंत पोहोचल्या. ४०० कोटी रुपयांचा टप्पा आता फार दूर नाही. किंबहुना दसरा-दिवाळी सणांच्या या मंगलमय दिवसांत या स्वागत ठेव योजनेच्या माध्यमातून ४०० कोटी रुपयांच्या उंबरठ्यावर स्वरूपानंद पतसंस्थेच्या ठेवी पोहोचलेल्या दिसाव्यात म्हणून ही स्वागत ठेव योजना महत्त्वाची आहे.


हाताच्या बोटावर असणारे प्रारंभीचे ठेवीदार पाहता पाहता शेकड्यांत गेले. आता तर ठेव खात्यांनी २८ हजारांचा टप्पा गाठला आहे. याचा अर्थ इतक्या मोठ्या प्रमाणावर ठेवीदार स्वरूपानंद पतसंस्थेतील गुंतवणूक संधी खूप विश्वासार्ह म्हणून स्वरूपानंद संस्थेच्या ठेव योजनेचा स्वीकार करतात, ही बाब संस्थाचालक म्हणून माझ्यासाठी खूप मौलिक आहे. सातत्याने अग्रेसर होणारे स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेचे अर्थकारण ठेवीदारांच्या सातत्यपूर्ण प्रतिसादाने अधिक प्रगल्भ, अधिक मजबूत होऊन पुढे जात आहे.

दसरा-दिवाळी स्वागत ठेव योजना हा स्वरूपानंद पतसंस्थेसाठी वर्षातील दुसरा ठेव महोत्सव असतो. मंगलमय सणांच्या पार्श्वभूमीवर गुंतवणूकदारांसाठी विविध ठेव योजना घोषित करताना खूप आनंद होतो. कारण कोणतीही ठेव योजना घोषित झाली, की स्वरूपानंद पतसंस्थेच्या सर्वच कार्यालयांत नवा-जुना ठेवीदार मोठ्या संख्येने येता होतो. ठेवीदारांच्या आगमनामुळे संस्थेची सर्वच कार्यालये त्यांच्या स्वागताची लगबग करताना पाहताना खूप आनंद होतो. ठेवीदारांचा हा प्रतिसाद नवी उमेद देणारा ठरतो. ठेवीदारांच्या प्रतिसादातून नवी प्रेरणा प्राप्त होते. खरे सांगायचे, तर संपूर्ण यंत्रणेलाच नवचैतन्य प्राप्त होते. व्यवस्थापकांपासून चतुर्थश्रेणी कर्मचारी, पदाधिकारी ते संचालक हा प्रत्येक घटक ठेवीदारांच्या संपर्कासाठी, ठेवीदारांशी संवाद साधण्यासाठी आतुर झालेला दिसतो. प्रत्येक कार्यालयातील हा माहौल अवर्णनीय असतो. ठेवीदारही अत्यंत स्नेहाने, उत्साहाने आपली ठेव गुंतवण्यासाठी संस्था कार्यालयांशी संपर्क साधतात. म्हणजे ठेववृद्धी अभियानात सर्वदूर सर्व गुंतवणूकदारांचा सहभाग प्राप्त होतो. त्यामुळे जमा होणाऱ्या अर्थपुंजीला जनमानसाचा भक्कम आधार प्राप्त होतो. त्यामुळे जमा होणाऱ्या भांडवलाची ताकद अधिक वाढते आणि संस्थेचे अर्थकारण अधिक सशक्त होते.

**दसरा-दिवाळी स्वागत ठेव योजना हा स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेसाठी वर्षातील दुसरा ठेव महोत्सव असतो. नारीशक्ती, ज्येष्ठ अनुभवशक्ती यांना दुवा बनवून युवा शक्तीला स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेशी संलग्न करण्यासाठी यंदाचा दसरा-दिवाळी स्वागत ठेव उपक्रम समर्पित करत आहोत. ठेवींच्या ४०० कोटी रुपयांच्या टप्प्याचे सीमोल्लंघन करण्याच्या दिशेने आणि समाजाच्या अर्थकारणालाही चालना देण्याच्या दृष्टीने हा उपक्रम अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे.**

दसरा-दिवाळी हे मोठे सण आहेत. खरे तर या सणासुदीच्या दिवसांत आपण आपापल्या कुवतीनुसार भरपूर खर्च आनंदाने करत असतो. याचा अर्थ या कालावधीत हातात बऱ्यापैकी पैसे खेळत असतात. कर्मचारी-अधिकारीवर्गाला बोनस, सानुग्रह अनुदाने मिळतात. नवे व्यापार, व्यवसाय वेग पकडतात. बागांसंदर्भातील नवे करार याच कालावधीत होतात. बाजारातील उलाढाल वाढलेली दिसते. अशा या कालावधीत आपल्या गुंतवणुकीकडे लक्ष वेधावे, यासाठी थोडा आकर्षक व्याजदर देऊन दसरा-दिवाळी स्वागत ठेव योजना स्वामी स्वरूपानंद पतसंस्था घोषित करते. त्यातून ठेवीदारांना गुंतवणुकीची सुरक्षित, आकर्षक विश्वासार्ह संधी उपलब्ध होते. यातून मोठी रक्कम संग्रहित होते. त्यातून नवी कर्जे वितरित करणे शक्य होते. याचा अर्थ संस्थेच्या ठेव योजनांत गुंतवणूक करताना प्राप्त होणारे व्याज इतक्या संकुचित दृष्टिकोनातून या गुंतवणुकीकडे न पाहता एक प्रकारे समाजजीवनातील अर्थचक्र आपल्या परीने गतिमान करण्यासाठी गुंतवणूकदारांचे हे योगदान असते. त्यामुळे व्याजउत्पन्नप्राप्तीबरोबरच अर्थकारण गतिमान करण्यासाठीचा हा सहभाग फार मौलिक ठरणारा आहे.

सहकार क्षेत्राने पतसंस्था ही व्यवस्था निर्माण केली. ‘महाराष्ट्र सहकार कायदा १९६०’द्वारे पतसंस्थांचे नियमन आणि नियंत्रण होते. सरकारचा थेट सहभाग नसलेली, पण सरकारचे नियंत्रण असलेली ही बँकसदृश व्यवस्था असून, लोकसहभाग हा त्या व्यवस्थेचा आत्मा आहे. लोकांनी लोकांसाठी लोकांची म्हणून चालवलेली ही व्यवस्था खूप लोकप्रिय ठरली. कारण ती अत्यंत उपयुक्त पद्धतीने सक्रिय झाली. कायद्यानेच पतसंस्थांना लवचीक पद्धतीने काम करण्याची मुभा दिली. त्यामुळे लोकांच्या गरजा ओळखून निर्माण केलेल्या योजना, उपक्रम हे स्वाभाविकच उपयुक्त ठरले आणि मोठा प्रतिसाद प्राप्त झाला. मोठी भांडवल उभारणी झाली, रोजगारनिर्मिती झाली. सध्याच्या जीवघेण्या आर्थिक ....(पान ६ वर)



# सोनेतारण कर्ज : व्यावसायिकतेबरोबरच भावनिकताही

**सोने हा भारतीयांच्या अत्यंत जिव्हाळ्याचा विषय आहे. दसरा-दिवाळीसारख्या सणासुदीच्या काळात सोन्याची आवर्जून खरेदी केली जाते. याच सोन्याचा उपयोग अडचणीच्या काळात तातडीने पैसे उभे करण्यासाठीही होऊ शकतो. म्हणून स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था सोनेतारण कर्ज हा विषय अत्यंत प्रभावीपणे हाताळते. त्याचा लाभ आतापर्यंत असंख्य ग्राहकांना झाला आहे. पतसंस्थेकडून दिल्या जाणाऱ्या सोनेतारण कर्जसुविधेच्या वैशिष्ट्यांविषयी थोडक्यात माहिती देणारा हा लेख...**

सोने हा भारतीयांच्या अत्यंत जिव्हाळ्याचा विषय. सोने हा गुंतवणूक पर्याय म्हणून गेल्या काही वर्षांत अधिक प्रकर्षाने पुढे आला असला, तरी सोन्याशी भारतीयांचे आणि खासकरून स्त्रियांचे पूर्वापार फार जवळचे भावनिक नाते असते. आपली आई-आजी-सासूबाई किंवा जवळच्या नात्यातील आणखी कोणी तरी प्रेमाने दिलेला दागिना किंवा वडील-भाऊ-पती यांपैकी कोणी तरी लग्न-मुंजीसारख्या आयुष्यातील महत्त्वाच्या कार्यक्रमात कौतुकाने घेतलेला दागिना अशा किती तरी आठवणी प्रत्येक स्त्रीकडे असतात. आधुनिक काळात स्त्रिया स्वतःच्या पायावर उभ्या आहेत. त्यामुळे त्या अभिमानाने स्वतःच्या कष्टाच्या कमाईतून दागिने घेतात, गुंतवणूक म्हणून सोन्याची खरेदी करतात किंवा अगदी सॉव्हरिन गोल्ड बाँड, गोल्ड एक्स्चेंज ट्रेडेड फंड यांसारख्या पर्यायांमध्येही गुंतवणूक करतात. अर्थात, सोने हा काही फक्त स्त्रियांपुरताच मर्यादित विषय नाही, हेही तितकेच खरे आहे.

असे हे सोने अडचणीच्या काळात झटकन आर्थिक मदत उभी करण्यासाठी उपयुक्त ठरते. पूर्वी सावकारीच्या माध्यमातून सोन्याच्या बदल्यात पैसे मिळत असले, तरी त्यात फसवणुकीचे प्रकार खूप घडायचे. आताच्या काळात सोनेतारण कर्ज हा एक उत्तम कायदेशीर मार्ग उपलब्ध आहे. यात किफायती व्याजदर असतो आणि ग्राहकांना त्यांच्या सोयीनुसार सोने सोडवून घेता येते. हे नियमानुसार होत असल्यामुळे सावकारी पाशातून ग्राहकांची मुक्तता झाली आहे. सोन्याशी असलेले भावनिक नाते, त्याचे मूल्य आणि एकंदर सर्वच बाबी लक्षात घेऊन स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेने सोनेतारण कर्ज द्यायला सुरुवात केली. ही पतसंस्था आपल्या नावलौकिकाला साजेशा उत्तम पद्धतीने प्रभावीपणे आणि भावनिकता जपून सोनेतारण कर्ज हा विषय हाताळते. त्यात ग्राहकांना कोणत्याही प्रकारचा त्रास न होता, त्यांची जास्तीत जास्त सोय होण्याच्या दृष्टीने पतसंस्थेकडून झटपट सोनेतारण कर्ज दिले जाते, असे अध्यक्ष ॲड. दीपक पटवर्धन यांनी सांगितले. या सुविधेच्या वैशिष्ट्यांविषयी त्यांनी दिलेल्या माहितीचा हा गोषवारा...

स्वामी स्वरूपानंद सहकारी संस्थेच्या सोनेतारण कर्जसुविधेचा लाभ घेणाऱ्यांची संख्या मोठी आहे. सोने, दागिने हा स्त्रियांचा भावनिक विषय असल्याने पतसंस्थेतील सोनेतारण कर्ज विभागात महिला कर्मचारीच नेमण्यात आले आहेत, जेणेकरून कर्जासाठी येणाऱ्या महिलांना कोणत्याही प्रकारचा संकोच वाटू नये. सोनेतारण कर्जाचा फॉर्म कम्प्युटराइज्ड पद्धतीने भरला जातो. त्यामुळे ग्राहकाने एकदा दिलेली माहिती पुनःपुन्हा द्यावी लागत नाही. शिवाय अवघ्या २० ते २५ मिनिटांत कर्ज मंजूर होऊन ग्राहकांना कर्जाचे पैसे दिले जातात. त्यामुळे येणाऱ्या ग्राहकांचा खूप मोलाचा वेळ वाचतो. त्यांचा कामाचा पूर्ण दिवस वाया जात नाही. अर्धा दिवस त्यांना त्यांच्या कामासाठी शिल्लक राहतो. हातावर पोट असलेल्या ग्राहकांच्या दृष्टीने ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. झटपट कर्जवितरणाच्या या अनुभवामुळेच स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेची सोनेतारण कर्जसुविधा लोकप्रिय झाली. तारणासाठी ठेवलेल्या सोन्याची शुद्धता/कस तपासण्यासाठी आधुनिक यंत्राचा वापर केला जातो. त्यामुळे जास्तीत जास्त कर्जाची उपलब्धता करून देता येते. एक कोटी रुपयांपर्यंतचे कर्ज या माध्यमातून उपलब्ध



केले जाऊ शकते. कर्जाचा व्याजदर ग्राहकाची गरज, त्याच्याकडील सोने, परतफेडीची मुदत यांवर अवलंबून असतो; मात्र तो दर ग्राहकांच्या दृष्टीने किफायतशीर असेल, याची काळजी घेतली जाते. ग्राहकांनी आणलेल्या सोन्याच्या बदल्यात त्यांना देण्याजोग्या कर्जाची रक्कम त्यांच्या गरजेपेक्षा कमी असेल, तर परतफेडीचा कालावधी किंवा अन्य बाबींमध्ये बदल करून त्यांना जास्तीत जास्त कर्ज कसे उपलब्ध करून देता येईल, असा स्वरूपानंद पतसंस्थेचा प्रयत्न असतो. मुदत संपल्यानंतरही कर्जफेड पूर्ण न झाल्यास व्याजाची परतफेड करून घेऊन कर्जाचे नूतनीकरण करून देणे किंवा कर्जफेड पूर्ण झाली असल्यास ग्राहकाचे दागिने परत करणे वगैरे बाबी वेळच्या वेळी आणि काटेकोरपणे केल्या जातात. त्यामुळे पतसंस्थेतील दागिन्यांच्या लिलावाचे प्रमाण फारच कमी आहे.

समजा, एखाद्या महिलेने गरजेपोटी काही दागिने तारण ठेवून कर्ज घेतले असेल आणि नंतर एखाद्या कार्यक्रमाच्या वेळी तिला त्यातील एखादाच दागिना वापरण्यासाठी परत हवा असेल, तर मुदतीआधी तेवढाच एक दागिना परत देण्याची सोय कोणत्याच पतसंस्थेत किंवा बँकेत नसते. कारण पूर्ण कर्जफेड केल्याशिवाय ते दागिने परत देता येत नाहीत; मात्र समजा त्या महिलेने तारण ठेवलेल्या दागिन्यांपैकी तिला आवश्यक असलेल्या तेवढाच दागिना सोडवण्यापुरती कर्जाची रक्कम भरली, तर स्वामी स्वरूपानंद पतसंस्था तो दागिना महिलेला मुदतीआधीही परत देते. सोन्याशी स्त्रियांच्या असलेल्या भावनिक नात्याची जाणीव ठेवून पतसंस्थेकडून ही सुविधा दिली जाते. ग्राहकांनी तारण ठेवलेल्या दागिन्यांच्या सुरक्षिततेचीही पूर्ण काळजी पतसंस्थेकडून घेतली जाते. कोणतीही आर्थिक तडजोड न करता नामवंत कंपनीच्या तिजोऱ्याच दागिने ठेवण्यासाठी सर्व शाखांमध्ये वापरल्या जातात. त्या तिजोऱ्यांची किंमत लाखोंच्या घरात आहे. सर्व शाखांमध्ये सोन्याचे मूल्यमापन करण्यासाठी नाणावलेल्या सोनारांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे मूल्यांकन योग्य रीतीने होतेच; शिवाय रोजगारनिर्मितीही झाली आहे. एकंदरीतच, स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेकडून इतर सर्व व्यवहारांप्रमाणेच सोनेतारण कर्ज या विषयातही व्यावसायिकता काटेकोरपणे पाळली जातेच; मात्र सोन्याचा भावनिक पैलू लक्षात घेऊन त्या दृष्टीनेही विचार केला जातो, हेच पतसंस्थेचे वेगळेपण आहे.

**- अनिकेत कोनकर**

(पान ४ वरून)....

# ४०० कोटींचा टप्पा : सीमोल्लंघनाच्या दिशेने...

स्पर्धेच्या या युगातही अनेक आव्हाने, अनेक नियम, बंधने अपुरे नवतंत्रज्ञान या सर्वांशी सामना करत ही लोकचळवळ पुढे जात आहे. कारण या चळवळीत लोकांचा थेट सहभाग आहे. परस्परांवर विश्वास आहे. आणि प्रत्येकाच्या नजरेसमोर अशी अनेक उदाहरणे आहेत, की ज्यात पतसंस्थांनी गरजेवेळी मोलाची आणि वेळेत केलेली मदत सहज लक्ष वेधून घेते.

स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेच्या दसरा-दिवाळी ठेव योजनेत गुंतवणूक करण्याचे आवाहन करताना गुंतवणूकदाराच्या गुंतवणुकीच्या माध्यमातून होणारे सामाजिक-आर्थिक योगदान अर्थकारणाला गतिमान करणार आहे, हा सामाजिक पदरही व्यक्तिगत लाभाबरोबरच खूप समाधान देणारा ठरावा असा आहे. मंगलमय वातावरणात सणांचा आनंद मनमुरादपणे लुटताना स्वरूपानंद पतसंस्थेच्या विश्वासार्ह ठेव योजनांचा लाभ आपण सर्वांनी घ्यावा.

महिलावर्ग म्हणजे नारीशक्ती आणि ज्येष्ठ नागरिक म्हणजे अनुभवसंपन्नतेचे भांडार. या दोन सामाजिक शक्तींसाठी स्वरूपानंद पतसंस्था आकर्षक व्याजदर देत आली आहे. या दोन्ही प्रेरक शक्तींना या लेखाच्या माध्यमातून आवाहन करण्याची संधी घेतो आणि विनम्रपणे विदित करतो, की आपल्या युवा वर्गालाही स्वरूपानंद पतसंस्थेबद्दल आवर्जून माहिती द्या. स्वरूपानंद पतसंस्थेचे सातत्यपूर्ण अर्थकारण, विश्वासार्हता, अचूकता, ग्राहकसेवा याबद्दलच्या अनुभवांचे क्षण युवा पिढीसमोर ठेवा. नव्या पिढीलाही स्वरूपानंद पतसंस्थेशी जोडण्यासाठीचा महत्त्वपूर्ण दुवा म्हणून आपली नोंद करा, असे विनम्र आवाहन आपणाला करतो. स्वरूपानंद पतसंस्थेच्या आर्थिक स्थितीचा आढावा स्वरूप सहकारच्या प्रत्येक अंकाचा अविभाज्य घटक आहे. ३७९ कोटी रुपयांच्या ठेवी, २७२ कोटींची कर्जे, १६७ कोटींची बँक गुंतवणूक, ९९.५२ टक्के वसुली, ५० कोटींचा स्वनिधी, लेखापरीक्षणात सतत मिळणारा अ वर्ग, २८ टक्क्यांच्या घरात पोहोचलेली भांडवल पर्याप्तता (CRAR), आठ कोटी ३२ लाख रुपयांचा निव्वळ नफा अशी भक्कम आर्थिक स्थिती समोर ठेवून हा दसरा-दिवाळी स्वागत ठेव उपक्रम आपल्या गुंतवणुकीला साद घालत आहे. आपण प्रतिसाद द्याल ही खात्री, नव्हे विश्वास आहे. तुमचा विश्वास जपणे हे आमचे व्रत आहे, याची जाणीव जागृत ठेवून, हे अर्थविश्व अधिक व्यापक करण्याच्या उद्दिष्टाप्रति समर्पितता ठेवून आपणा सर्वांना दसऱ्याच्या मनःपूर्वक शुभेच्छा देतो.

## दसरा-दिवाळी स्वागत ठेव योजना व्याजदर

**- स्वरूपांजली ठेव योजना :**
(१२ ते १८ महिने) ७.७५% (सर्वसाधारण) ८.००% (ज्येष्ठ नागरिक, महिला)


**- एकरकमी 5 लाख रु. व अधिक :**
(१२ ते १८ महिने) ८.५०% (MIS सुविधा फक्त १८ महिन्यांसाठी)

**- सोहम ठेव योजना 19 ते 36 महिने (मासिक व्याज) :** ८.००% (सर्वसाधारण), ८.२५% (ज्येष्ठ नागरिक, महिला)

**– ॲड. दीपक पटवर्धन**
◆ **अध्यक्ष**,
स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था
◆ **संपादक**, स्वरूप सहकार

# अभ्यासू, व्यावसायिक नेतृत्वामुळे सातत्यपूर्ण यशप्राप्ती

**'स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेच्या सातत्यपूर्ण यशाचे महत्त्वाचे कारण म्हणजे अध्यक्ष ॲड. दीपक पटवर्धन यांची अभ्यासू वृत्ती आणि राजकीय क्षेत्रात कार्यरत असूनही त्याचा कोणताही प्रभाव पतसंस्थेच्या कामकाजावर पडू न देण्याची त्यांनी कटाक्षाने जपलेली व्यावसायिकता,' असे मत सुहास दिगंबर पाटणकर यांनी व्यक्त केले. जनता सहकारी बँकेतील आपल्या ४० वर्षांच्या कारकिर्दीत श्री. पाटणकर यांनी वेगवेगळी पदे भूषवली. त्यापैकी १५ वर्षे त्यांनी विविध शाखांमध्ये व्यवस्थापक म्हणून जबाबदारी सांभाळली. निवृत्तीनंतरही ते बँकिंग विषयातील तज्ज्ञ म्हणून अनेक प्रशिक्षण केंद्रांशी संबंधित आहेत. स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेची जाणवणारी वैशिष्ट्ये पाटणकर यांनी या लेखात मांडली आहेत.**



**सुहास पाटणकर**

स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेशी मी ठेवीदार म्हणून अनेक वर्षे निगडित आहे. तसेच बँकिंग, अर्थकारण या विषयांसंदर्भात अध्यक्ष ॲड. दीपक पटवर्धन यांच्याशी चर्चेचा योगही अनेकदा येतो. ही पतसंस्था दीर्घ काळ सातत्याने यशप्राप्ती करते आहे, ही बाब महत्त्वपूर्ण आहे. या यशामागे अनेक कारणे आहेत. अध्यक्ष ॲड. पटवर्धन यांचा प्रोफेशनॅलिझम अर्थात व्यावसायिकता हे त्यातील एक महत्त्वाचे कारण आहे. ते स्वतः पक्षीय राजकारणात आहेत; मात्र पतसंस्था चालवताना त्याचा प्रभाव कुठेही पडणार नाही, याची काळजी ते घेतात. आर्थिक संस्था चालवताना पुरेशी व्यावसायिकता लागते. ती त्यांच्याकडे पुरेपूर आहे. त्यामुळेच राजकीय भूमिका आणि पतसंस्थाध्यक्षपद यात त्यांची अजिबात गल्लत होताना दिसत नाही. बऱ्याचदा असे दिसते, की राजकीय क्षेत्रातील व्यक्तींशी संबंधित पतसंस्था पक्षांच्या दावणीला बांधल्या जातात. कार्यकर्त्यांची आर्थिक सोय पाहायची म्हणून अशा पतसंस्थांचा वापर करून घेतल्याचे दिसते. राजकीय प्रभाव असलेल्या संस्थांमध्ये गडबड झाल्याची उदाहरणे ऐकू येतात. राजकारणातील लोकप्रियतेसाठी आर्थिक संस्थांची मदत घेणे, त्यातील पैशांचा योग्य उपयोग न करणे, राजकीय प्रभावाने कर्ज देणे हे प्रकार घडतात. त्यातून त्या संस्थांची वाताहत होते; मात्र पटवर्धन यांनी पक्षीय राजकारण आणि पतसंस्थेचे अध्यक्षपद या दोन्ही भूमिका कटाक्षाने पूर्णपणे भिन्न ठेवल्याचे आढळते. ते अत्यंत प्रोफेशनल आहेत. त्यामुळे त्यांची विश्वासार्हता हे पतसंस्थेच्या यशाचे महत्त्वाचे कारण आहे.

ॲड. पटवर्धन अभ्यासू वृत्तीने या क्षेत्रातील आधुनिक वाऱ्यांचा अंदाज घेऊन घेत असलेले निर्णय आणि ठरवत असलेली धोरणे हेही पतसंस्थेच्या यशाचे कारण आहे. सहकारी पतसंस्थांच्या नियामक संस्थेने पतसंस्थांना लागू केलेले नियम तर ते पाळतातच; पण बँकांची नियामक संस्था असलेली भारतीय रिझर्व्ह बँक (आरबीआय) बँकांच्या बाबतीत म्हणते जे काही म्हणते तेही ते पतसंस्थांच्या बाबतीत हळूहळू लागू करू पाहतात, हे खूप महत्त्वाचे आहे. सध्या आपल्याला ते लागू नसले, तरी भविष्यात ते लागू होईल अशा विचाराने आतापासूनच पाया तयार केला तर पतसंस्था शिस्तीत वाढेल, असा त्यांचा दृष्टिकोन असावा. आरबीआय बँकिंग यंत्रणेत आधुनिकता आणू पाहतेय. बँका, पतसंस्था हे अर्थकारणातील महत्त्वाचे घटक आहेत. आर्थिकदृष्ट्या आरोग्यपूर्ण पद्धतीने त्यांची वाढ व्हावी म्हणून नियामक संस्था वेगवेगळे नियम आणि मार्गदर्शक सूचना तयार करत असतात. भांडवल पर्याप्तता अर्थात कॅपिटल ॲडिक्वसी हा त्यातीलच एक भाग. आर्थिक संस्थेने केवळ ठेवीदारांच्या जिवावर उड्या मारून व्यवहार करायचे नाहीत, त्यांचा स्वनिधीही मोठा पाहिजे, स्वतःचे भागभांडवल पाहिजे, हे त्यामागचे सूत्र. रिझर्व्ह बँक किंवा कोणत्याही नियामक संस्थेचे मूलभूत तत्त्व असे असते, की ठेवीदार पूर्णतः सुरक्षित राहिले पाहिजेत. बँक किंवा पतसंस्था बुडाली तर ठेवीदारांना फटका बसतो. ते होऊ नये म्हणून आरबीआय म्हणते, की 'तुम्ही आधीपासूनच तरतुदी करा. दर वर्षीच्या नफ्यामधून विशिष्ट पद्धतीने रकमा बाजूला काढा. म्हणजे संस्था मजबूत होतील. भविष्यात कधी आणीबाणीची वेळी आली, तर पाया मजबूत असल्यामुळे संस्था त्यातून बाहेर पडू शकतील.' या गोष्टी बँकांना लागू आहेत आणि पतसंस्थांना हळूहळू लागू झालेल्या आहेत. त्या गोष्टी स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेत चांगल्या पद्धतीने पाळल्या जातात. पतसंस्थेच्या सक्षमतेसाठी कॅपिटल ॲडिक्वसी, एनपीए (अनुत्पादक कर्जे) यांबाबतीतील प्रुडेन्शियल नॉर्म्स (दूरदृष्टीने घेतलेले निर्णय) पाळले गेले आहेत. बुडीत कर्जे संस्थेला व्याज मिळवून देत नाहीत. त्यामुळे त्यांच्यासाठी तरतूद करावी लागते; मात्र 'जी कदाचित भविष्यात अनुत्पादक होऊ शकतील अशा उत्पादक कर्जांसाठीही (स्टँडर्ड असेट्स) तरतूद करा. दर वर्षी मिळणारा सगळा नफा वाटून टाकू नका, तो भविष्यासाठी बाजूला काढून ठेवा. वेळ आलीच, तर या तरतुदी उपयोगाला येतील आणि अर्थसंस्था अडचणीत येणार नाहीत. साहजिकच ठेवीदारही अडचणीत येणार नाहीत,' असे रिझर्व्ह बँकेचे धोरण सांगते. स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेचा नेट एनपीए शून्य आहे, याचा अर्थ अनुत्पादक कर्जांसाठी शंभर टक्के तरतूद झालेली आहे. ही पूर्णतः सुरक्षित स्थिती आहे. नियामक संस्थेची धोरणे तापदायक नसून, दीर्घ काळाचा विचार केल्यास फायद्याची असतात, हे जाणून या पतसंस्थेचा कारभार चालतो, हे अत्यंत महत्त्वाचे आहे.

'भासवायचे भलतेच आणि करायचे भलतेच' असे प्रकार अन्य क्षेत्रांप्रमाणे या क्षेत्रातही पाहायला मिळतात; मात्र ते स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेच्या बाबतीत दिसत नाही. या पतसंस्थेच्या व्यवहारांमध्ये स्पष्टता असते आणि कारभार पारदर्शक आहे. ठेवीदारांची/ग्राहकांची जागरूकता, सहकार, बँकिंग या गोष्टी लोकांना समजाव्यात, या अनुषंगाने ॲड. पटवर्धन यांचा बराच प्रयत्न असतो. पतसंस्थांची किंवा कोणत्याही आर्थिक संस्थेची आर्थिक पत्रके कशी पाहावीत, ती मजबूत आहेत की नाहीत हे कसे ओळखावे, याबद्दलचा लेख त्यांनी 'स्वरूप सहकार'च्या मागील अंकात लिहिला होता. एखाद्या पतसंस्थेचे प्रमुख या पद्धतीने ग्राहकांच्या जागरूकतेचे काम करत आहेत, हे खूप महत्त्वाचे आहे. आमच्या किंवा कोणत्याही पतसंस्थेत काय काय पाहायचे, हे स्वतः अध्यक्षच सांगत असल्याचे कुठे पाहायला मिळत नाही. ग्राहक जागरूकता कमी असली तर बरे; म्हणून काही गोष्टी मोघम ठेवण्याचा प्रयत्न असल्याचे चित्र अलीकडे अनेकदा अनेक ठिकाणी दिसते; मात्र स्वामी स्वरूपानंद पतसंस्था त्याला अपवाद आहे. ....(पान ८ वर)

# अर्थकारणाला चालना देण्यात सहकार चळवळीचे योगदान मोठे : ॲड. दीपक पटवर्धन



रत्नागिरी : 'सहकार चळवळ आपल्या संस्कृतीत आहे. सहकाराची व्याप्ती वाढते आहे. सहकार चळवळीच्या माध्यमातून देशाच्या आर्थिक उभारणीत महत्त्वाचे योगदान करण्यासाठी सज्ज होऊया,' असे आवाहन ॲड. दीपक पटवर्धन यांनी केले. पोस्टल कर्मचारी, हिवताप कर्मचारी आणि कृषी खाते कर्मचारी संस्थांच्या सर्वसाधारण सभेमध्ये प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते.

'आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष सध्या सुरू असून, त्या वर्षात आयोजित केलेल्या या सर्वसाधारण सभा आपल्या सहकारी संस्थेला नवी दिशा देणाऱ्या ठराव्यात. विकसित भारताचे स्वप्न साकारताना प्रत्येक सहकारी संस्थेच्या माध्यमातून होणारे आर्थिक व्यवहार बाजारपेठेशी संलग्न होत असतात. त्यातून अर्थकारणाला गती मिळते. संस्थेच्या माध्यमातून होणारी भांडवलनिर्मिती, गुंतवणूक, कर्जवितरण यातून निर्माण होणारा वित्तस्त्रोत हा शेवटी बाजारपेठेशी संलग्न होतो आणि अर्थकारणाला चालना देतो. सहकाराचे हे योगदान महत्त्वपूर्ण आहे,' असे प्रतिपादन ॲड. पटवर्धन यांनी केले.

'सभासदांच्या गरजा ओळखून उपक्रम राबवल्यास सहकार चळवळी अधिक गतिमान होतील. महानगरापासून ग्रामीण भागापर्यंत सर्वच क्षेत्रांत सहकाराला अनन्यसाधारण महत्त्व आहे. भारतीय नागरिक म्हणून प्रामाणिकपणे सहकार चळवळीतील आपले कर्तव्य चोख बजावून 'सहकार से समृद्धी' हा मंत्र सत्यात उतरवू या,' असे आवाहन ॲड. पटवर्धन यांनी केले. तिन्ही संस्थांमध्ये सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. संस्थांचे अध्यक्ष आणि संचालक यांनी सभा कामकाजात सक्रिय सहभाग नोंदवला आणि अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात सभा पार पडल्या.

---

(पान ७ वरून)....

## अभ्यासू, व्यावसायिक नेतृत्वामुळे सातत्यपूर्ण यशप्राप्ती

संस्थेने सुरू केलेल्या या मासिकातही ग्राहकांना जागरूक करणारी माहिती दिली जाते.

पतसंस्थेचे मार्केटिंगचे तंत्रही खूप चांगले आहे. ठेववृद्धी मासाचे उदाहरण त्यासाठी देता येईल. हा उपक्रम मी बरीच वर्षे पाहतोय. ठरावीक कालावधीत राबवल्या जात असलेल्या उपक्रमाची लोक वाट पाहत असतात. हे मार्केटिंगचे तंत्र आहे. जून-जुलैमध्ये पतसंस्थेचा ठेववृद्धी मास येईल, बाजारातील दरापेक्षा थोडा जास्त व्याजदर तेव्हा मिळेल, हे लोकांच्या मनात ठसलेले आहे. त्यामुळेच अन्य बँकांना मिळत नाहीत तेवढ्या म्हणजे २५-३० कोटी रुपयांच्या ठेवी एका महिन्यात स्वरूपानंद पतसंस्थेला मिळतात. ही सोपी गोष्ट नाही. अध्यक्ष प्रोफेशनली संस्था चालवत असल्याचे प्रतिबिंब पतसंस्थेच्या ताळेबंदात दिसते. या पतसंस्थेचा संमिश्र व्यवसाय ६५० कोटींपर्यंत गेला आहे. हे दीर्घकालीन यश त्यांच्या धोरणांचे आहे. मी तटस्थपणे हे निरीक्षण नोंदवतो आहे.

आपल्याकडच्या ठेवी वाढाव्यात म्हणून काही संस्था बाजारापेक्षा खूप जास्त व्याजदर देऊ करतात. बँकांचा व्याजदर कम्पाउंडिंग असतो आणि पतसंस्थांचा सिंपल इंटरेस्ट रेट असतो. तरीही राष्ट्रीयीकृत बँकांचा दर साडेसहा टक्क्यांच्या आसपास सुरू असताना, काही पतसंस्थांकडून दहा-साडेदहा टक्के व्याजदराची जाहिरात केली जाते. हे दर बाजाराशी विसंगत असतात आणि धोकादायकही असतात. जेवढे आकर्षण दाखवले जाते, तेवढी जोखीमही अधिक असते; मात्र स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेत तसे केले जात नाही. फक्त ठेववृद्धी मासापुरता आणि तोही थोड्या प्रमाणातच जास्त व्याजदर दिला जातो. एरव्ही त्यांचे व्याजदर उगाचच अतिरिक्त नसतात. कारण जास्त व्याजदर देणे म्हणजे स्वतःच्या पायावर धोंडा पाडून घेण्यासारखे असते. कोणतीही बँक किंवा पतसंस्था ठेवी घेऊन नुसत्या आपल्या पदरात बाळगत नाही. जास्त व्याजदर देणे म्हणजे कॉस्ट (खर्च) जास्त आणि फायदा कमी होत असतो. जास्त व्याजदर देऊन घेतलेल्या ठेवींचा विनियोग झाला नाही, त्या योग्य दराने कर्जाऊ वाटल्या गेल्या नाहीत, तर तोटा होतो. समजा, नऊ टक्के व्याजदर देऊन ठेव घेतलेली आहे, ती ठेव १२-१३ टक्के दराने कर्जाऊ वाटण्याची संधी असेल, तरच तो व्यवहार फायद्याचा होतो. कर्जवाटपाची संधी नसेल किंवा कर्जबाजारात मुळात कर्जांना मागणी कमी असेल, तर ठेवींचे व्याजदर वाढवून उपयोग होत नाही. उलट त्यामुळे फायदा कमी होतो. हे थेट व्यावसायिक गणित असते आणि ते स्वरूपानंद पतसंस्थेने पाळलेले दिसते. इतर संस्था करतात म्हणून बाजाराबरोबर वाहवत जाऊन आंधळेपणाने एखादा निर्णय या पतसंस्थेत घेतला जात नाही. ही संस्था उगाच ठेवी घ्यायच्या म्हणून घेताना अजिबात दिसत नाही. ज्या ठेवी येतील, त्यांचा कर्जाद्वारे योग्य विनियोग कसा करता येईल किंवा गुंतवणूक कशी करता येईल, याचे नियोजन करून तोटा होणार नाही असे व्यवस्थापन केलेले दिसते. ॲड. पटवर्धन प्रत्येक गोष्टीवर अभ्यास करूनच सर्व व्यवहार करतात, हे निर्विवादपणे खरे आहे.

स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेतर्फे दिली जाणारी समाधानकारक ग्राहक सेवा हादेखील यशातील महत्त्वाचा मुद्दा आहे. ही चांगल्या पद्धतीने चालवलेली पतसंस्था आहे. त्यामुळे तिथे ठेव ठेवायला हरकत नाही, असा सल्ला मी आवर्जून देतो. राज्यात पतसंस्था बहुसंख्य आहेत; पण ही पतसंस्था दीर्घ काळ चांगल्या पद्धतीने चालवली जात आहे, हे खूप महत्त्वाचे आहे. कोकणातील आणि रत्नागिरीतील या पतसंस्थेच्या कामगिरीचा आपल्याला अभिमान असला पाहिजे.

(शब्दांकन : **अनिकेत कोनकर**)

# स्वरूपानंद पतसंस्थेमुळेच आज मी उभा आहे : सुरेंद्र सावंत

## सुरभी ॲग्रो रिसॉर्टची यशोगाथा; पतसंस्थेने दिले १.६० कोटींचे कर्ज

**रत्नागिरी तालुक्यातील नरबे येथे पाच वर्षांपूर्वी सुरू करण्यात आलेले सुरभी ॲग्रो रिसॉर्ट आज नावारूपाला आले आहे ते तिथे असलेल्या वैविध्यपूर्ण-नावीन्यपूर्ण सुविधांमुळे आणि आपुलकीने केल्या जाणाऱ्या आदरातिथ्यामुळे. रत्नागिरी-सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पहिला वेव्हपूल हे तेथील एक वैशिष्ट्य. सुरेंद्र तथा बच्चू सावंत यांच्या या प्रकल्पाचे मूल्य जवळपास साडेतीन कोटी रुपये आहे. हे धाडसी पाऊल उचलताना स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेने विश्वास दाखवून १.६० कोटी रुपयांचे कर्ज विनासायास दिल्यामुळे आज आपण व्यवसायात घट्ट पाय रोवून उभे असल्याची भावना सावंत व्यक्त करतात. अनेक अडचणींवर मात करून ते आज इथपर्यंत पोहोचले आहेत. त्यांच्या या प्रेरक वाटचालीबद्दल जाणून घेऊ या त्यांच्याच शब्दांत...**



सुरेंद्र (बच्चू) सावंत

मी बच्चू सावंत या नावाने सर्वांना परिचित असलो, तरी माझे नाव सुरेंद्र चंद्रकांत सावंत. निवळी-गणपतीपुळे रस्त्यावरच्या नरबे गावात सुरू केलेला सुरभी ॲग्रो रिसॉर्टचा माझा व्यवसाय आज नावारूपाला आला आहे; मात्र अनेक अडचणींवर मात केल्यानंतर मला आजचा दिवस दिसला आहे. मी आणि पत्नीने खूप कष्ट करून व्यवसायात प्रगती केली आहे आणि आणखीही काही मोठी स्वप्ने आम्ही पाहिली आहेत. आमचा मुलगा आता हॉटेल मॅनेजमेंटचे शिक्षण घेत असून, या व्यवसायात लक्ष घालत आहे. आमच्या खडतर वाटचालीतील या यशाचे श्रेय आमच्या कष्टांबरोबरच स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेला जाते. रिसॉर्टचे धाडसी पाऊल उचलताना पतसंस्थेचे अध्यक्ष ॲड. दीपक पटवर्धन यांनी आमच्यावर खूप विश्वास दाखवून तब्बल १.६० कोटी रुपयांचे कर्ज तातडीने उपलब्ध करून दिले. एवढेच नव्हे, तर पतसंस्था कायम आमच्या पाठीशी आहे. त्यामुळेच आम्ही आज इथपर्यंत येऊन पोहोचलो आहेत, हे कृतज्ञतापूर्वक नमूद करणे मला आवश्यक वाटते.

रत्नागिरी शहराजवळचे परटवणे हे माझे मूळ गाव. माझे वडील चंद्रकांत गोपाळराव सावंत हे शिवसेनेचे राज्यातील पहिले नगरसेवक होते. ते २० वर्षे नगरसेवक होते, तर माझे आजोबा २५ वर्षे नगरसेवक होते. अशा प्रकारे राजकारणातून समाजकार्याचा वारसा मला प्राप्त झाला होता. त्यामुळे मी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. भारतीय जनता युवा मोर्चाचा जिल्हा उपाध्यक्ष म्हणून मी दोन वर्षे काम पाहिले. त्यानंतर मी जिल्हाध्यक्षपदाचीही जबाबदारी तीन वर्षे सांभाळली; मात्र व्यवसायाकडे दुर्लक्ष होऊ लागल्यामुळे मी सक्रिय राजकारणातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला; मात्र समाजकार्य आपल्या हातून सुरूच राहावे, अशी माझी इच्छा होती. म्हणून आधार फाउंडेशन नावाची संस्था स्थापन करून त्या माध्यमातून समाजकार्य सुरू केले.

## हॉटेल व्यवसायाचा प्रारंभ

२००३ साली मी हॉटेल व्यवसायाची सुरुवात केली. रत्नागिरी शहरात टीआरपी भागात सुरभी फॅमिली गार्डन रेस्टॉरंट सुरू केले. व्यवसायात नावीन्यपूर्ण उपक्रम राबवणे आणि स्वतः कष्ट करणे या दोन बाबींवर आमचा पहिल्यापासूनच भर होता. त्यामुळे त्या हॉटेलमध्ये सुरुवातीच्या काळात मी स्वतः भांडीही घासली आहेत. मुले लहान असूनही माझी पत्नी स्वतः १००-१५० पोळ्या करायची. हॉटेलमध्ये अन्य मदतही ती करायची. त्या वेळी चायनीज पदार्थांच्या गाड्या असत; मात्र त्या गाड्यांवर जाऊन पदार्थ खाणे महिलांना रुचत नसे. म्हणून कुटुंबीयांना बसून चायनीज पदार्थ खाता येतील, अशी सुविधा आम्ही सुरभी हॉटेलमध्ये पहिल्यांदा सुरू




टीआरपी (रत्नागिरी) येथील सुरभी हॉटेल.



सुरभी ॲग्रो रिसॉर्ट, नरबे

केली. ती संकल्पना खूप प्रसिद्ध झाली. रत्नागिरीत आजही चायनीजसाठी आमच्या हॉटेलचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. स्विगी प्लॅटफॉर्मवर सर्वाधिक ऑर्डर्स मिळाल्यामुळे दोन वर्षांपूर्वी त्यांच्याकडून किंग ऑफ रेस्तराँ हा विशेष पुरस्कारही मिळाला होता.

## साडेतीन कोटींच्या रिसॉर्टचे स्वप्न पतसंस्थेमुळे प्रत्यक्षात

२०१० साली मी निवळी-गणपतीपुळे रस्त्यावर नरबे गावात आंबा बागेसाठी साडेसात एकर प्लॉट घेतला होता. तिथे आंब्याच्या ४५० कलमांची लागवड केल्यानंतर थोडी जागा शिल्लक होती. त्या वेळी कृषी पर्यटन अर्थात ॲग्रो टुरिझमची क्रेझ होती. हॉटेल व्यवसायाचा अनुभव माझ्या गाठीशी होता. म्हणून मी धाडसाने तिथे ॲग्रो रिसॉर्टचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प सुरू करायचे ठरवले; पण असा मोठा प्रकल्प सुरू करायचा म्हणजे आर्थिक पाठबळ ही सर्वांत आवश्यक गोष्ट. त्या वेळी स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेने आम्हाला मोठी मदत केली. पतसंस्थेचे अध्यक्ष ॲड. दीपक पटवर्धन यांच्याशी माझी लहानपणापासूनच ओळख. आम्ही दोघेही परटवण्यातीलच. पुढे राजकीय क्षेत्रातही त्यांनी मला मोठी साथ दिली. मी मोठ्या व्यवसायात उतरल्यानंतर स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेच्या माध्यमातून ते माझ्या पाठीशी भक्कमपणे उभे राहिले. मी जेव्हा माझा मानस त्यांना सांगितला, तेव्हा त्यांनी किती पैसे पाहिजेत असे विचारले. मी एक कोटी ६० लाख रुपयांची मागणी केल्यावर त्यांनी तेवढे कर्ज देण्यास अगदी लगेचच होकार दिला. मला वर्ष-सव्वा वर्षात प्रकल्प उभा करायचा होता. त्यामुळे तातडीने पैशांची गरज होती. ती ओळखून पटवर्धन साहेबांनी मला प्रकल्पाचे काम सुरू करायला सांगितले आणि कर्ज लवकरात लवकर मंजूर करू, असा शब्द दिला. त्यानुसार, अक्षरशः महिन्याभराच्या आतच त्यांनी पैसे माझ्या हातात दिले. कर्जाची सगळी प्रक्रिया वेगाने पूर्ण करण्यात व्यवस्थापक मोहन बापट आणि उपव्यवस्थापक हेमंत रेडीज यांच्यासह सर्व कर्मचाऱ्यांचेही चांगले सहकार्य मिळाले. स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेने केलेल्या या मोलाच्या अर्थसाह्यामुळे माझा प्रकल्प २०२०मध्ये उभा राहिला. आमचे सुरभी हॉटेल प्रसिद्ध झालेले असल्यामुळे तेच नाव ॲग्रो रिसॉर्टला दिले. मला तातडीने पैसे मिळणे अत्यावश्यक होते. शिवाय, आपुलकीची सेवा हाही महत्त्वाचा मुद्दा होता. म्हणूनच मी कोणत्याही बँकेऐवजी स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेकडे गेलो आणि त्या संस्थेने विश्वास सार्थ ठरवला.

## कोरोनात सारे ठप्प झाले; पण हप्ते थकवले नाहीत

आमचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प सुरू झाला खरा; पण त्यानंतर महिन्याभरातच कोरोनाच्या साथीमुळे लॉकडाउन लागू झाले. मलाही कोरोनाचा संसर्ग झाला. माझी प्रकृती गंभीर होती; मात्र समाजसेवेतून मिळालेल्या लोकांच्या आशीर्वादामुळेच माझे प्राण वाचले, अशी माझी श्रद्धा आहे. तो काळ खूपच कसोटीचा होता. त्या काळात मला स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेने खूपच सांभाळून घेतले. माझा कर्जाचा हप्ता दोन लाखांचा होता आणि त्या कालावधीत उत्पन्न शून्य होते. सगळे काही सुरळीत चालले असते, तर कर्ज परतफेड आरामात करू शकू असा पूर्ण विश्वास मला होता; पण अचानक आलेल्या कोरोनाच्या संकटाने सगळीच गणिते बदलली. एकदा हप्ते थकायला सुरुवात झाली असती, तर कर्जाचा बोजा मी कधीच उतरवू शकलो नसतो. ते सगळे आवाक्याबाहेर गेले असते. शिवाय पटवर्धन साहेबांनी ज्या विश्वासाने आपल्या शब्दाखातर आपल्याला कर्ज दिले, त्या विश्वासाला मला तडा जाऊ द्यायचा नव्हता. म्हणून काही ना काही पर्यायी व्यवस्था करून मी कोरोनाच्या काळात कर्जाच्या हप्त्यांची परतफेड केली. त्यामुळे एकही हप्ता थकण्याची नामुष्की ओढवली नाही. पतसंस्था आणि माझ्यासाठीही ही गोष्ट महत्त्वाची ठरली. आतापर्यंत मी बऱ्यापैकी परतफेड केली असून, आता थोडेच कर्ज शिल्लक आहे. त्यामुळे माझा निर्णय योग्य ठरला, याची जाणीव मला आहे. गावात साडेतीन कोटींचा प्रकल्प सुरू करत असताना काही जणांनी शंकाही घेतली होती; मात्र माझा स्वतःवर विश्वास होता. विशेष म्हणजे माझे मित्र ॲड. विनय आंबुलकर यांनी खूप भरीव सहकार्य वेळोवेळी केले.

# सुरभी ॲग्रो रिसॉर्टच्या वर्धापनदिनी ॲड. दीपक पटवर्धन यांनी व्यक्त केलेले मनोगत




बच्चू सावंत यांचे आजपर्यंतचे कार्य, त्यांचा संघर्ष मी स्वतः आणि आम्ही सगळ्यांनी पाहिला आहे. वडिलांचा वारसा घेऊन ते करत असलेले काम कौतुकास्पद आहे. त्यांनी अनेक व्यवसाय केले आणि प्रत्येक व्यवसाय यशस्वी केला. त्यातून काही तरी नवी संकल्पना आणि प्रेरणा घेऊन नवीन व्यवसायाकडे जाण्याची जिद्द ठेवली. तीच जिद्द त्यांनी आपल्या मुलामध्येही निर्माण केली आहे, याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. त्यांनी ग्रामीण भागात सगळ्या अडचणींवर मात करून सुरभी ॲग्रो रिसॉर्ट हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प उभा केला. वेव्हपूल उभारण्याचे स्वप्नही पूर्ण केले. त्याबद्दल त्यांचे कौतुक कोणत्या शब्दांत करायचे, हे कळत नाही. पदवीधर नागरी सहकारी संस्थेचे संचालक म्हणूनही ते कार्यरत असून, त्यांचा दुसरा कार्यकाळ सुरू आहे. स्वतः फारशी प्रसिद्धी न घेता काम करत राहायचे हा त्यांचा गुण आहे. आपला एक ग्राहक सभासद एवढा मोठा व्यवसाय अतिशय उत्तम रीतीने उभारून तो चालवतो आहे, याचा स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेला अभिमान आहे. त्यांच्या वाटचालीत अनेक आव्हाने होती, गुंतागुंत होती. ती पेलत पुढे जाणे, प्रत्येक संकटातून मार्ग काढणे कौतुकास्पद आहे. नियतीने त्यांची परीक्षा बघायचे ठरवले होते. अनेक खडतर प्रसंगांतून ते सहीसलामत बाहेर आले. कारण त्यांच्यात ठायीठायी चांगुलपणा भरलेला आहे. त्यांची देवावर प्रचंड श्रद्धा आहे आणि प्रामाणिकपणे काम करत असल्यामुळे त्यांना हे यश मिळत आहे. त्यांना असेच यश मिळो आणि पंचतारांकित हॉटेल उभे करण्याचे त्यांचे स्वप्नही पूर्ण होवो, अशा सदिच्छा! व्यवसायात ते ज्या पद्धतीने नवनवीन उपक्रम करत आहेत, त्या प्रत्येक उपक्रमात स्वामी स्वरूपानंद पतसंस्था सहभागी असेल, असे अभिवचन मी देतो.

## कोरोनानंतर पुन्हा जोमाने काम

कोरोनाची लाट गेल्यावर २०२१मध्ये पुन्हा जोमाने कामाला सुरुवात केली. मुख्य रस्त्यापासून आमचे रिसॉर्ट दोन किलोमीटर आत असल्यामुळे वेगळे काही तरी करू या, असा विचार सुरू होता. वेव्हपूल अर्थात समुद्रासारख्या लाटांचा अनुभव देणारा तलाव कोकणात कुठेच नव्हता, असे मुलाने सांगितले. मग तो करायचे ठरवले. फक्त त्या वेव्हपूलचे बजेटच ८० लाख रुपयांचे होते. त्याशिवाय वॉटर स्लाइड, रेनडान्स अशा वेगवेगळ्या सुविधा सुरू केल्या. एकूण प्रकल्प साडेतीन कोटी रुपयांचा झाला. स्वरूपानंद पतसंस्थेने दिलेले एक कोटी ६० लाखांचे कर्ज आणि उर्वरित मी उभारलेला निधी यातून हा प्रकल्प साकार झाला. आता आमच्याकडे तीन स्विमिंग पूल, कॅम्प फायर, मल्टिपर्पज हॉल, फिश स्पा, विविध इनडोअर-आउटडोअर गेम्स अशा सुविधा आहेत. हनिमून पॅकेजही आमच्याकडे उपलब्ध असून, वाढदिवस, लग्न, साखरपुड्यासारखे कार्यक्रमही आमच्याकडे होतात. हट्स आहेतच. शिवाय डॉर्मिटरीही आहे. जागा कमी पडू लागली म्हणून जी नवी डॉर्मिटरी सुरू करतोय, त्यात ५२ जण एका वेळी राहू शकतात. क्वालिटी, क्वांटिटी आणि स्वच्छता या तीन गोष्टींवर आम्ही विशेष लक्ष देतो. त्यामुळे एकदा जेवून गेलेला माणूस आमच्याकडे परत येतोच, हा विश्वास आम्ही ग्राहकांमध्ये विकसित करण्यात यशस्वी झालो आहोत. माझा मुलगा आता हॉटेल मॅनेजमेंटचे शिक्षण घेत असून, तो शेवटच्या वर्षाला आहे. भविष्यात पंचतारांकित हॉटेल उभारण्याचे माझे स्वप्न आहे. मुलाच्याही मनात अनेक संकल्पना आहेत. त्या आम्हाला प्रत्यक्षात आणायच्या आहेत.

## कडक शिस्तीची पतसंस्था

मी पदवीधर नागरी सहकारी पतसंस्थेचा संचालक म्हणून, तसेच जिल्हा पतसंस्था फेडरेशनचा चिटणीस म्हणूनही सध्या काम करतो आहे. माझ्याबद्दल पटवर्धन साहेबांना असलेल्या विश्वासामुळेच ही संधी मिळाली. आमच्या सुरभी ॲग्रो रिसॉर्टचा वर्धापनदिन नुकताच साजरा झाला. त्या वेळी पटवर्धन साहेबांनी आवर्जून रिसॉर्टला भेट दिली. वेव्हपूलसह सगळ्याच सुविधांचे त्यांनी कौतुक केले. रिसॉर्टच्या सौर प्रकल्पाचा विषय निघाल्यावर किती खर्च येणार अशी चौकशी त्यांनी केली आणि १६-१७ लाख रुपयांचे बजेट सांगितल्यावर त्यासाठीही लगेच कर्ज उपलब्ध करून देण्याचा शब्द त्यांनी दिला. कारण त्यांना माझ्या परतफेडीबद्दल त्यांना विश्वास आहे. स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेमुळेच मी आज उभा आहे. माझ्या स्वतःच्या छोट्या रकमेच्या एक-दोन मुदत ठेवी पतसंस्थेत आहेत; मात्र भविष्यात अधिक मुदत ठेव ठेवण्याचा मानस आहे. माझ्या शब्दाखातर अनेकांनी तिथे गुंतवणूक केली आहे. ही आपलीच पतसंस्था आहे, असे समजून आम्ही तिथे गुंतवणुकीचा किंवा कर्ज घेण्याचा सल्ला अनेकांना देतो. अर्थात, पतसंस्थेचे आर्थिक व्यवहार अत्यंत कडक शिस्तीचे आहेत. त्यामुळे अशी शिस्त पाळू शकतील, अशा माणसांनाच मी तिथे पाठवतो. कारण अशा कोणाच्या गैरशिस्तीमुळे पतसंस्थेला त्रास होऊन तिथून मला फोन येता कामा नये, याची काळजी मी घेतो. अध्यक्ष ॲड. दीपक पटवर्धन यांच्यासह स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेला खूप खूप शुभेच्छा!

■

# सभासद आणि ग्राहक परिचय धोरण

महाराष्ट्र राज्य बिगर कृषी सहकारी पतसंस्था नियामक मंडळाने राज्यातील बिगर कृषी सहकारी पतसंस्थांना 'सभासद व ग्राहक परिचय धोरण' (KYC) या बाबतीत मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. नैसर्गिक व्यक्तीच्या खात्यांसाठी आवश्यक कागदपत्रांची माहिती ऑगस्टच्या अंकात प्रसिद्ध करण्यात आली होती. कायदेशीर व्यक्तींच्या खात्यांसाठी आवश्यक कागदपत्रांची माहिती या भागात देत आहोत.

**भागीदारी संस्थेच्या (एलएलपीसह) खात्याकरिता केवायसी नॉर्म्सनुसार ओळख पुराव्यासाठी आवश्यक कागदपत्रे :**

१) भागीदारी संस्थेचे पॅनकार्ड अनिवार्य. यामध्ये कोणतीही सवलत नाही; २) भागीदारी पत्राची प्रत; ३) भागीदारी नोंदणी दाखला/भागीदारीपत्र व इतर कागदपत्रे दाखल केल्याची पोचपावती व नोंदणी फी भरल्याची पावती; ४) भागीदारीपत्रात कोणताही बदल नसल्याबाबतचे सर्व भागीदारांचे निवेदन व तसा बदल असल्यास त्याबाबतची कागदपत्रे; ५) खात्यावर व्यवहार करणाऱ्या भागीदारांचे दोन अद्ययावत रंगीत फोटो, पॅनकार्ड आणि आधार कार्ड; ६) व्यावसायिक लायसेन्स प्रत; ७) खात्यावर व्यवहार करण्यासाठी सर्व भागीदारांच्या सह्यांचे अधिकारपत्र (भागीदारीपत्रात उल्लेख नसल्यास)

**पत्त्याच्या पुराव्यासाठी आवश्यक कागदपत्रे :**

१) भागीदारी व्यवसाय ठिकाण जागेची संबंधित कागदपत्रे; २) दुकान आणि स्थापना कायदा परवाना; ३) खात्यावर व्यवहार करणाऱ्या भागीदारांचे कोणत्याही सेवा प्रदात्याचे दोन महिन्यांपेक्षा जास्त जुने नसलेले युटिलिटी बिल (वीज, टेलिफोन, पोस्टपेड मोबाइल फोन, पाइप गॅस, पाणी बिल)

**प्रायव्हेट लिमिटेड कंपनीच्या खात्याकरिता ओळख पुराव्यासाठी आवश्यक कागदपत्रे :**

१) प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचे पॅनकार्ड अनिवार्य; २) मेमोरँडम/आर्टिकल ऑफ असोसिएशन प्रत; ३) कंपनी नोंदणी दाखला; ४) कंपनीच्या संचालक मंडळात कोणताही बदल नसल्याबाबतचे सर्व संचालकांचे निवेदन व तसा बदल असल्यास त्याबाबतची कागदपत्रे; ५) खाते उघडणे व खात्यावर व्यवहार करणाऱ्या संचालक यांना अधिकार प्रदान केल्याबाबतचा संचालक मंडळ ठराव, तसेच ज्या संचालकांना असे अधिकार प्रदान केले जातील त्यांचे दोन अद्ययावत रंगीत फोटो, पॅनकार्ड आणि आधार कार्ड; ६) कंपनीच्या कॉमन सीलवर सह्या करण्यासंबंधी अधिकार प्रदान केल्याबाबतचा संचालक मंडळ ठराव; ७) व्यावसायिक लायसेन्स प्रत; ८) खात्यावर व्यवहार करण्यासाठी सर्व भागीदारांच्या सह्यांचे अधिकारपत्र (भागीदारीपत्रात उल्लेख नसल्यास)

**पत्त्याच्या पुराव्यासाठी आवश्यक कागदपत्रे :**

१) व्यवसाय ठिकाण जागेची संबंधित कागदपत्रे; २) दुकान आणि स्थापना कायदा परवाना; ३) खात्यावर व्यवहार करणाऱ्या संचालकांचे कोणत्याही सेवा प्रदात्याचे दोन महिन्यांपेक्षा जास्त जुने नसलेले युटिलिटी बिल




**विश्वस्त संस्थेच्या (ट्रस्ट) खात्याकरिता ओळख पुराव्यासाठी आवश्यक कागदपत्रे :**

१) विश्वस्त संस्थेचे (ट्रस्ट) पॅनकार्ड अनिवार्य; २) विश्वस्त संस्थेची घटना (ट्रस्ट डीड) नियम आणि नियमावली कंपनी नोंदणी दाखला; ३) धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या नोंदणी प्रमाणपत्राची प्रत; ४) विश्वस्त मंडळात कोणताही बदल नसल्याबाबतचे सर्व विश्वस्तांचे निवेदन व तसा बदल असल्यास त्याबाबतची कागदपत्रे; ५) खाते उघडणे व खात्यावर व्यवहार करणाऱ्या विश्वस्तांना अधिकार प्रदान केल्याबाबतचा विश्वस्त मंडळ ठराव, तसेच ज्या विश्वस्तांना असे अधिकार प्रदान केले जातील त्यांचे दोन अद्ययावत रंगीत फोटो, पॅनकार्ड आणि आधार कार्ड; ६) विश्वस्त संस्थेच्या कॉमन सीलवर सह्या करण्यासंबंधी अधिकार प्रदान केल्याबाबतचा विश्वस्त संस्थेचा मंडळ ठराव; ७) व्यावसायिक असल्यास लायसेन्स प्रत; ८) खात्यावर व्यवहार करण्यासाठी सर्व विश्वस्तांच्या सह्यांचे अधिकारपत्र (विश्वस्त संस्थेच्या घटनापत्रात (ट्रस्ट डीड) उल्लेख नसल्यास)

**पत्त्याच्या पुराव्यासाठी आवश्यक कागदपत्रे :**

१) विश्वस्त संस्था ठिकाण जागेची संबंधित कागदपत्रे; २) दुकाने आणि स्थापना कायदा परवाना; ३) खात्यावर व्यवहार करणाऱ्या विश्वस्तांचे कोणत्याही सेवा प्रदात्याचे दोन महिन्यांपेक्षा जास्त जुने नसलेले युटिलिटी बिल

**सहकारी संस्था (बिगर कृषी सहकारी पतसंस्था (बहुराज्यीयसह) वगळून उर्वरित) खात्याकरिता ओळख पुराव्यासाठी आवश्यक कागदपत्रे :**

१) सहकारी संस्थेचे पॅनकार्ड अनिवार्य; २) सहकारी संस्थेची घटना (ट्रस्ट डीड) नियम आणि नियमावली, कंपनी नोंदणी दाखला; ३) सहकार निबंधक कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या नोंदणी प्रमाणपत्राची प्रत; ४) संचालक मंडळात कोणताही बदल नसल्याबाबतचे सर्व विश्वस्तांचे निवेदन व तसा बदल असल्यास त्याबाबतची कागदपत्रे; ५) खाते उघडणे व खात्यावर व्यवहार करणाऱ्या संचालकांना अधिकार प्रदान केल्याबाबतचा संचालक मंडळ ठराव, तसेच ज्या संचालकांना असे अधिकार प्रदान केले जातील त्यांचे दोन अद्ययावत रंगीत फोटो, पॅनकार्ड आणि आधार कार्ड; ६) सहकारी संस्थेच्या कॉमन सीलवर सह्या करण्यासंबंधी अधिकार प्रदान केल्याबाबतचा संचालक मंडळ ठराव; ७) व्यावसायिक असल्यास लायसेन्स प्रत; ८) खात्यावर व्यवहार करण्यासाठी सर्व संचालकांच्या सह्यांचे अधिकारपत्र (उपविधीत उल्लेख नसल्यास)

**पत्त्याच्या पुराव्यासाठी आवश्यक कागदपत्रे :**

१) सहकारी संस्था ठिकाण जागेची संबंधित कागदपत्रे; २) दुकान आणि स्थापना कायदा परवाना (असल्यास); ३) खात्यावर व्यवहार करणाऱ्या संचालकांचे कोणत्याही सेवा प्रदात्याचे दोन महिन्यांपेक्षा जास्त जुने नसलेले युटिलिटी बिल

## पतसंस्था परिवारातील
# सप्टेंबर महिन्यातील वाढदिवस!
## सर्वांना वाढदिवसाच्या शुभेच्छा!




**प्रसाद कमलाकर जोशी,** संचालक
०९-०९-१९७४



**अभिजित अनंत विलणकर,** शाखाधिकारी-पाली शाखा
३०-०९-१९८४



**सुमित चंद्रशेखर घाणेकर,** शाखाधिकारी- जाकादेवी शाखा
२२-०९-१९८८



**विनायक विजय आग्रे,** लिपिक, कुवारबाव शाखा
३०-०९-१९९९



**संदीप राजाराम भातडे,** शिपाई, रत्नागिरी शाखा
२५-०९-१९८७

## स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेच्या शाखा

### रत्नागिरी जिल्हा

**रत्नागिरी :** दुसरा मजला, रत्नागिरी मध्यवर्ती एसटी स्टँडसमोर, प्रेसिडन्सी बिझनेस हाउस, रत्नागिरी - ४१५६१२, फोन : (०२३५२) २२१२६३, ९४०३५०६३६३

**मारुती मंदिर :** जोगळेकर संकुल, नाचणे रोड, मारुती मंदिर, रत्नागिरी फोन : (०२३५२) २२३५७७, २९५६३५, ९४२०२९३५७४

**कोकणनगर :** २५, इंदू निवास, कोकणनगर स्टॉप, मजगाव रोड, नूर क्लिनिकशेजारी, रत्नागिरी, फोन : ९४२२५६३६०९

**कुवारबाव :** गाळा नं. ४, वसुंधरा कॉम्प्लेक्स, कुवारबाव, ता. जि. रत्नागिरी, फोन : (०२३५२) २९५६१७, ९४२१५४१९११

**पावस :** रबिया कॉम्प्लेक्स, पावस बाजारपेठ, पावस, ता. जि. रत्नागिरी, फोन : (०२३५२) २३७००३, २९५८६३, ९४२०४८७०९४

**जाकादेवी :** प्रमिला कॉम्प्लेक्स, तळमजला, जाकादेवी बाजारपेठ, जाकादेवी, ता. जि. रत्नागिरी, फोन : (०२३५७) २५१४१८, २९५६६३, ९४०५५७६८२९

**खंडाळा :** अनंत कॉम्प्लेक्स, पहिला मजला, धारकर मेडिकलशेजारी, खंडाळा, ता. जि. रत्नागिरी, फोन : (०२३५७) २४३२६३, ९४०५०२५००९

**मालगुंड :** लक्ष्मी भवन, नॉव्हेल्टी स्टोअरसमोर, मालगुंड बाजारपेठ, मालगुंड, ता. जि. रत्नागिरी, फोन : (०२३५७) २३५२०२, ९४०५०३७३०८

**पाली :** दळी शॉपिंग सेंटर, पाली बाजारपेठ, पाली, ता. जि. रत्नागिरी, फोन : (०२३५२) २९५८५३, ८२७५६७५४४०

**लांजा :** सद्गुरू कृपा, हॉटेल प्रसन्नशेजारी, आठवडा बाजार, लांजा, ता. लांजा, जि. रत्नागिरी, फोन : (०२३५१) २९९०६०, ७५८८३००५८३

**राजापूर :** जी-२, दत्तसाई अपार्टमेंट, साई मंदिराजवळ, चव्हाणवाडी, ता. राजापूर, जि. रत्नागिरी, फोन : (०२३५३) २३२०६३, ९४२२९६३०९३

**नाटे :** श्री. अमोल देवरूखकर यांचे घर, सडापेठ नाटे, ता. राजापूर, जि. रत्नागिरी, फोन : (०२३५३) २९५८६३, ९४०३०४६५३८

**साखरपा :** जुगाई कृपा, जुना बस स्टँड, साखरपा बाजारपेठ, साखरपा, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी, फोन : (०२३५४) २९९१४७, ७५८८६६८११४

**देवरूख :** द्वारा श्री. श्रीरंग शिर्के, आपला बाजारच्या शेजारी, शिवाजी चौक, देवरूख, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी, फोन : (०२३५४) २६०२६३, ९४२११३८८३०

**चिपळूण :** लक्ष्मी गॅलॅक्सी, साउंड ऑफ म्युझिकसमोर, शिवाजी चौक, चिंचनाका, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी, फोन : (०२३५५) २५२७२८, ७५८८९३३८१०

### सिंधुदुर्ग जिल्हा

**देवगड-जामसंडे :** स्वरूप बिल्डिंग, जामसंडे बस स्टॉपजवळ, जामसंडे, ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग - ४१६६१२, फोन : (०२३६४) २६१२६३, ७५८८९५८७९८

### पुणे जिल्हा

**कोथरूड :** शॉप नं. ३, मेघरंजनी अपार्टमेंट, लेन नं. ६, डहाणूकर कॉलनी, कोथरूड, पुणे - ४११०३८, फोन : (०२०) २५३८५४७०, ९४०४५४८१३८

# स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था, रत्नागिरी

## ३१ ऑगस्ट २०२५ अखेरची आर्थिक स्थिती

**एकूण ठेवी**
₹ ३७८.८४
कोटी

**वितरित कर्जे**
₹ २७०.४६
कोटी

**गुंतवणूक**
₹ १६७.६१
कोटी

**निव्वळ नफा**
₹ ५.४२
कोटी

**खेळते भांडवल**
₹ ४५५.७२
कोटी

**स्वनिधी**
₹ ४८.१३
कोटी

**वसुलीचे प्रमाण**
९९.५३%

**सी.डी. रेशो**
६४.०१%

**सी.आर.ए.आर.**
२७.९८%



महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी अर्थात अमृत या महाराष्ट्र शासनाच्या स्वायत्त संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक विजय जोशी यांची स्वामी स्वरुपानंद सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष ॲड. दीपक पटवर्धन यांनी सदिच्छा भेट घेतली.

महाराष्ट्र राज्य खादी-ग्रामोद्योग महामंडळाचे अध्यक्ष रवींद्र साठे यांनी स्वामी स्वरुपानंद पतसंस्थेला सदिच्छा भेट दिली. त्या वेळी पतसंस्थेचे अध्यक्ष ॲड. दीपक पटवर्धन यांनी त्यांचा सत्कार केला. या वेळी 'आकाशवाणी'चे निवृत्त अधिकारी सुहास विद्वांस हेदेखील उपस्थित होते.





स्वामी स्वरुपानंद पतसंस्थेच्या देवगड शाखेचे खातेदार नीलकंठ मराठे यांना वाहनखरेदीसाठी अर्थसाह्य प्रदान करताना पतसंस्थेचे स्वरुप प्रभुदेसाई आणि गुरुप्रसाद जोशी.

पतसंस्थेच्या देवगड शाखेतर्फे इलेक्ट्रिक वाहनखरेदीसाठीही अर्थसाह्य करण्यात आले.






देशाच्या स्वातंत्र्यदिनानिमित्त 'हर घर तिरंगा' अभियानांतर्गत आयोजित करण्यात आलेल्या तिरंगा यात्रेमध्ये स्वामी स्वरुपानंद सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष ॲड. दीपक पटवर्धन यांच्यासह अधिकारी-कर्मचारी सहभागी झाले होते. जिल्हा सहकार उपनिबंधक डॉ. सोपान शिंदे यांनीही यात सहभाग घेतला होता.





राज्य सरकारच्या मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत प्रतीक फडके यांनी स्वामी स्वरुपानंद सहकारी पतसंस्थेत 11 महिन्यांचे प्रशिक्षण पूर्ण केले. त्यांना पतसंस्थेचे अध्यक्ष ॲड. दीपक पटवर्धन यांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले.



# नवरात्रौत्सवाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा!

आमच्या विश्वासार्ह व आकर्षक ठेवयोजनांमध्ये गुंतवणूक करुन निश्चिंत व्हा !
ॲड. दीपक पटवर्धन (अध्यक्ष)

## दसरा दिवाळी ठेव योजना

22 सप्टेंबर ते 23 ऑक्टोबर

| स्वरूपांजली ठेव 12 ते 18 महिने | सोहम ठेव योजना 19 ते 36 महिने |
|---|---|
| | मासिक व्याज |
| 7.75 % (सर्वसाधारण) | 8.00 % (सर्वसाधारण) |
| 8.00 % (ज्येष्ठ नागरिक/महिला) | 8.25 % (ज्येष्ठ नागरिक/महिला) |

* एक रक्कमी रू. ५ लाख व अधिक ठेवीवर व्याजदर 8.50 % 12 ते 18 महिने

# स्वामी स्वरूपानंद सह.पतसंस्था

**मर्यादित रत्नागिरी जिल्हा | कार्यक्षेत्र महाराष्ट्र राज्य**

प्रेसिडेन्सी बिझनेस हाऊस, २ रा मजला, एस.टी.स्टॅण्डसमोर, रत्नागिरी.
मो. नं. 9403 506 363
www.swaroopanandpatsanstha.com